मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# भाजप-राष्ट्रवादीमध्ये पुन्हा 'तू-तू मैं-मैं'

## मागची पाने पलटली तर अजित पवारांना बोलता येणार नाही; मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवडमध्ये ते अनेक वर्षे सत्तेत होते. मागची पाने पलटायची आमची इच्छा नाही; पण तसे झाले तर बोलण्यासारखे बरेच काही आहे. आम्ही मागची पाने चाळली तर अजित पवारांना बोलता येणार नाही, असा टोला महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी लगावला. सत्तर हजार कोटींच्या कथित घोटाळ्याबाबत न्यायालयात सुनावणी सुरू असून, त्याचा निकाल अद्याप लागलेला नाही, अशी आठवणही त्यांनी करून दिली.





पिंपरी-चिंचवड शहरात महापालिका निवडणुकीच्या प्रचारासाठी महसूलमंत्री बावनकुळे मंगळवारी (दि. ६) आले होते. शहरात विविध ठिकाणी प्रचारसभा घेतल्या. त्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला.

### त्यांना सल्ला देण्याएवढा मोठा नाही

» बावनकुळे म्हणाले, महायुतीच्या समन्वय समितीच्या बैठकीत मनभेद निर्माण होईल, असे वक्तव्य टाळण्याचा निर्णय झाला आहे. अजित पवारांना सल्ला देण्याइतका मी मोठा नाही; पण त्यांनी समन्वय समितीत ठरल्याप्रमाणे वागायला हवे होते.

### निकाल आल्यावर पुढची भूमिका ठरेल...

अजित पवार यांनी पत्रकार परिषदेत, 'माझ्यावर ७० हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचे आरोप झाले, हे सगळ्यांना माहिती आहे; पण ज्यांनी हे आरोप केले, त्यांच्यासोबतच मी आज सरकारमध्ये बसलो आहे,' असा युक्तिवाद केला होता. त्यांच्या या वक्तव्यावर महसूलमंत्री बावनकुळे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. हे काही अभिमानास्पद नाही. प्रकरण न्यायालयात आहे, निकाल आल्यावर पुढची भूमिका ठरेल. अजित पवार प्रगल्भ नेते आहेत. एवढ्या छोट्या महापालिका निवडणुकीसाठी अशा बाबी बाहेर काढून महायुतीत मनभेद निर्माण करणे योग्य नाही. बोलता खूप येईल, मात्र ही ती वेळ नाही, असेही बावनकुळे म्हणाले.

# मोशी-बोराडेवाडी परिसरात कमळ फुलणार

## सारिका बोऱ्हाडे-सस्ते यांचा विश्वास, नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोशी, बोऱ्हाडेवाडी आणि चिखली गावठाण परिसरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, भाजपच्या उमेदवार सारिका बोऱ्हाडे-सस्ते यांनी प्रचारात मोठी आघाडी घेतली आहे. आमदार महेश दादा लांडगे यांच्या खंद्या समर्थक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सारिका बोऱ्हाडे-सस्ते यांच्या जनसंपर्क मोहिमेला या भागात नागरिकांचा मोठा पाठिंबा मिळत असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.

सारिका बोऱ्हाडे-सस्ते यांनी गेल्या काही वर्षांत मोशी आणि



चिखली परिसरात केलेल्या विकासकामांची पावती म्हणून नागरिक त्यांच्याकडे आशेने पाहत आहेत. विशेषतः बोऱ्हाडेवाडी आणि चिखली गावठाण भागातील रस्ते, पाणीपुरवठा आणि स्वच्छता यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर त्यांनी दिलेल्या लक्षामुळे महिला वर्ग आणि तरुणांमध्ये त्यांच्याबद्दल सकारात्मक भावना आहे. प्रचारादरम्यान गाठीभेटी घेताना "आमदार महेश दादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही प्रभागाचा चेहरामोहरा बदलला असून, जनतेचा विश्वास हीच आमची खरी ताकद आहे," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

केंद्रात आणि राज्यात भारतीय जनता पक्षाचे सरकार असल्याने विकासाचे 'डबल इंजिन' वेगाने धावत आहे. याच धर्तीवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत पुन्हा भाजपची सत्ता येणे शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असल्याचे मत बोऱ्हाडे-सस्ते यांनी मांडले. महापालिकेत भाजपची सत्ता आल्यास प्रभागातील प्रलंबित कामे आणि भविष्यातील मोठे प्रकल्प प्राधान्याने मार्गी लावले जातील, असे आश्वासनही त्यांनी यावेळी मतदारांना दिले.

प्रभागातील नागरिकांशी संवाद साधताना असे दिसून आले की, भाजपच्या पॅनलला सर्वच स्तरातून चांगला प्रतिसाद मिळत आहे. प्रामुख्याने आमदार महेश लांडगे यांनी भोसरी विधानसभेत राबविलेली विकासकामे आणि सारिका बोऱ्हाडे-सस्ते यांचा स्थानिक संपर्क यामुळे विरोधकांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. "आमच्या प्रभागातील उर्वरित विकासकामे पूर्ण करण्यासाठी आणि भागाचा कायापालट करण्यासाठी आम्ही भाजपच्या पाठीशी ठाम आहोत," अशी भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# प्रभाग क्रमांक 4 मध्ये 'एकतर्फी' विजयाची चिन्हे

## दिघी-बोपखेलमध्ये उदय गायकवाड यांच्या झंझावाताने विरोधकांचे धाबे दणाणले

**पिंपरी | प्रतिनिधी**

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ४ (दिघी-बोपखेल) मधील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, भाजपचे निष्ठावान आणि आमदार महेश दादा लांडगे यांचे कट्टर समर्थक उदय गायकवाड यांनी प्रचारात मोठी आघाडी घेतली आहे. गायकवाड यांच्या पाठीशी असलेल्या युवा कार्यकर्त्यांची मोठी फळी आणि त्यांना मिळणारा उत्स्फूर्त जनप्रतिसाद पाहून सध्या विरोधकांच्या गोटात अस्वस्थता पसरली असल्याचे चित्र दिसत आहे.







उदय गायकवाड हे मागील अनेक वर्षांपासून भारतीय जनता पक्षात सक्रिय असून, त्यांना मोठा राजकीय वारसा लाभला आहे. केवळ वारसाच नव्हे, तर स्वकर्तृत्वावर त्यांनी प्रभागात दांडगा जनसंपर्क निर्माण केला आहे.

सर्वसमावेशक नेतृत्व' अशी ओळख असलेल्या गायकवाड यांनी प्रत्येक नागरिकाच्या अडीअडचणीला धावून जाण्याचा आपला स्वभाव कायम जोपासला आहे. त्यांच्याकडे असलेल्या कामाची धमक आणि प्रभागाच्या सर्वांगीण विकासाची दूरदृष्टी यामुळे सुशिक्षित तरुण वर्ग आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या प्रमाणावर त्यांच्याशी जोडले जात आहेत.

आमदार महेश दादा लांडगे यांचे खंबीर नेतृत्व आणि उदय गायकवाड यांची स्थानिक पातळीवरील पकड यामुळे दिघी-बोपखेल परिसरात भाजपची ताकद कित्येक पटीने वाढली आहे. सध्या सुरू असलेल्या प्रचारादरम्यान नागरिकांकडून मिळणारा पाठिंबा पाहता, विरोधकांना अक्षरशः घाम फुटला असून या प्रभागात गायकवाड यांच्या एकतर्फी विजयाची चिन्हे स्पष्टपणे दिसत आहेत. प्रभागाचा विकास हाच ध्यास घेऊन मैदानात उतरलेल्या या युवा नेतृत्वाला मतदारांकडून मिळणारा आशीर्वाद पाहता, प्रभाग क्रमांक ४ मध्ये कमळ फुलणार असल्याची खात्री कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

# लोकप्रिय सामाजिक कार्यकर्त्या अश्विनी संजय वाबळे यांना प्रभाग क्रमांक 8 मध्ये मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

प्रभाग क्रमांक ८ मधील प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या सौ. अश्विनी संजय वाबळे यांनी आपल्या समाजकार्याच्या जोरावर जनमानसात एक अढळ स्थान निर्माण केले असून, आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांना मतदारांचा प्रचंड प्रतिसाद लाभत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या अश्विनी ताईंनी गेल्या अनेक वर्षांपासून प्रभागातील रस्ते, पाणी आणि स्वच्छतेच्या प्रश्नांसह महिलांच्या सक्षमीकरणासाठी उल्लेखनीय काम केले आहे. त्यांच्या याच निस्वार्थी सेवेमुळे त्यांना प्रभागातील 'योग्य उमेदवार' म्हणून पाहिले जात असून, तरुण वर्गापासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांच्या भावना त्यांच्या पाठीशी ठामपणे उभ्या आहेत. सध्या प्रभागात होत असलेल्या जनसंपर्क मोहिमेदरम्यान महिलांनी त्यांचे औक्षण करून स्वागत केले, तर स्थानिकांनी त्यांच्या कामावर विश्वास दर्शवत त्यांना पूर्ण पाठिंबा जाहीर केला आहे.

समाजसेवेची प्रदीर्घ परंपरा आणि जनसामान्यांच्या अडीअडचणींना धावून जाण्याची वृत्ती यामुळे अश्विनी संजय वाबळे यांची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत असून, आगामी काळात प्रभागाच्या विकासासाठी त्या खंबीर नेतृत्व ठरतील, अशी भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

प्रभागातील ही बदलती राजकीय आणि सामाजिक परिस्थिती पाहता सुज्ञ मतदार काम करणाऱ्या माणसाला सभागृहात पाठवतील असा विश्वास सुजाता ताईंकडून व्यक्त करण्यात येत आहे.



# ‘आम्ही काय केले, हे विचारणा-यांनी आरसा पहावा’

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवारांवर नाव न घेता टीका

**पुणे | प्रतिनिधी**

कोणी जर आम्हाला काम काय केले हे विचारणार असतील. तर, त्यांनी एकदा आरसा पाहावा, 'अशा शब्दात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर नाव न घेता सोमवारी टीका केली. ‘ते दादा (अजित पवार) बोलत आहेत. हे दादा (चंद्रकांत पाटील) बोलत आहेत. निवडणूक रंगात येत आहे. मात्र आपण जेवढे मागे जावू तेवढे वाढेल, असे सांगत फडणवीस यांनी जास्त बोलणेही टाळले.

दरम्यान, ‘मुंबई बदलू असे सांगितले तेव्हा, मला वेड्यात काढले होते. मात्र, मुंबईचा विकास करून दाखविला आहे. त्यानुसार येत्या पाच वर्षात पुण्याचा चेहरा मोहरा बदलू असा विश्वासही व्यक्त करतानाच शहराच्या सर्वांगिण विकासासाठी आगामी काळात सुमारे ८० हजार कोटी रुपयांच्या विविध विकासकामांच्या योजना राबविण्यात येतील,’ अशी घोषणा फडणवीस यांनी केली.

पुण्यातील कात्रज चौक येथे आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील मंत्री पंकजा मुंडे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, शहरातील आमदार आणि भाजपचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

‘पुणे हे सांस्कृतिक, औद्योगिक आणि शैक्षणिक दृष्ट्या देशातील महत्त्वाचे शहर असून राज्याचे आर्थिक इंजिन आहे. गेल्या पाच वर्षांत पुणे महापालिकेत सत्तेत असताना शहराचा सर्वांगीण विकास करण्यात आला. त्यामुळे टीका करणाऱ्या विरोधकांनी वस्तुस्थिती तपासावी. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र आणि राज्य सरकारने पुण्यासाठी भरीव विकास आराखडा तयार केला आहे,’ असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. येत्या पाच वर्षात पुण्याचा चेहरा मोहरा बदलू असा विश्वासही व्यक्त करतानाच शहराच्या सर्वांगिण विकासासाठी आगामी काळात सुमारे ८० हजार कोटी रुपयांच्या विविध विकासकामांच्या योजना राबविण्यात येतील,’ अशी घोषणा फडणवीस यांनी केली.

अजित पवार गेले काही दिवस विकासकामांच्या नावाने भाजपवर टीका करत आहेत. परंतु, अजितदादा अनेक वर्ष पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री राहिलेले आहेत. त्यांनी त्यांच्या काळात भरीव विकास का केला नाही, अशी विचारणा जनता आता करत आहे, अशी टीका मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली.



### सरकारचा संकल्प

**» पुणे मेट्रोचे ११० किमी मार्ग नियोजित असून त्यातील ३१ टक्के काम पूर्ण झाले आहे. तर, २४ किमी मार्ग अंतिम टप्प्यात आहे. समान पाणीपुरवठा योजनेचे ७५ टक्के काम पूर्ण झाले असून सांडपाणी प्रक्रिया आणि ८८ किलोमीटर लांबीच्या नदी सुधार प्रकल्पामुळे पूरनियंत्रण तसेच पर्यावरण संरक्षण होणार आहे. शहरासाठी ४४ हजार कोटींचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी उड्डाणपूल, रिंग रोड, ५४ किलोमीटर लांबीचे भुयारी मार्ग, तसेच इंटेलिजेंट ट्रॅफिक सिस्टिम योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे. एआय आधारित सीसीटीव्ही, स्मार्ट शाळा आणि परवडणारी आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा सरकारचा संकल्प आहे.’ असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.**

### अजित पवारांनी विकास का केला नाही ?

**» पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांचे सरकार वर्षानुवर्ष पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेत होते. गेल्या निवडणुकीत बहुमत मिळून सलग पाच वर्ष भाजपचे सरकार या दोन शहरात होते. त्यामुळे अनेक विकासकामे सुरू झाली. मात्र, अजित पवार गेले काही दिवस विकासकामांच्या नावाने भाजपवर टीका करत आहेत. परंतु, अजितदादा अनेक वर्ष पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री राहिलेले आहेत. त्यांनी त्यांच्या काळात भरीव विकास का केला नाही, अशी विचारणा जनता आता करत आहे, अशी टीका मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली.**

> **“शहराचे विस्तारीकरण आगामी काळात होणार असल्यामुळे दूरदृष्टी ठेवून नेमक्या कोणत्या उपाययोजना केल्या पाहिजे हे पालकमंत्री अजित पवार यांना कारभार सांभाळताना यापूर्वी लक्षात आले नाही का? पुणेकर विरोधकांना सत्तेत येण्यासाठी कोणती संधी देणार नाहीत.**
>
> **- मुरलीधर मोहोळ , केंद्रीय सहकार राज्यमंत्री**

---

# पुणे महापालिका निवडणूक; भाजपाकडून 91 महिला उमेदवार, नारीशक्तीचा विक्रम

## महिला आरक्षणापलीकडे जाऊन सर्वसाधारण जागांवरही महिलांना संधी

**पुणे | प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीने यंदा पुणे महापालिका निवडणुकीसाठी 165 जागांपैकी 91 ठिकाणी महिलांना उमेदवारी दिली आहे. भाजपा हा अन्य कोणत्याही राजकीय पक्षाच्या तुलनेत सर्वाधिक महिलांना उमेदवारी देणारा पक्ष ठरला आहे. महिला आरक्षण असलेल्या जागेव्यतिरिक्त नऊ सर्वसाधारण जागांवर महिलांना उमेदवारी देऊन भाजपाने नारीशक्तीवरचा विश्वास प्रकट केला आहे. अपवाद वगळता राजकीय पार्श्वभूमी व घराणेशाही नसलेल्या सर्वसामान्य युवा महिला उमेदवारांना संधी, हेही भाजपाच्या उमेदवार यादीचे वैशिष्ट्य ठरले आहे.



समाजाचा 50 टक्के घटक असणाऱ्या महिलांना 50 टक्क्यांहून अधिक जागा देत महिला सबलीकरणासाठी प्रत्यक्ष कृती करणारा पक्ष म्हणून महापालिकेच्या इतिहासात भाजपाची नोंद झाली आहे. निवेदिता एकबोटे, संगीता दांगट, अर्चना जगताप, विनया बहुलीकर, कविता वैरागे, वीणा घोष, पल्लवी जावळे, रेश्मा भोसले आणि रंजना टिळेकर या नऊ जणींना सर्वसाधारण जागेवर भाजपाने संधी दिली आहे.

पुणे महापालिकेत महिला सातत्याने निवडून आल्या आहेत. अनेक महिलांनी पुण्याचे महापौरपद भूषविले आहे. मात्र बहुतेकदा महिला आरक्षण असल्यानेच संबंधित पक्षांना महिलांना संधी द्यावी लागली होती. भाजपाने उमेदवारी यादी निश्चित करताना स्वच्छ प्रतिमा, शिक्षण, सामाजिक कार्य आणि जनहिताची कळकळ या मुद्द्यांवर महिला उमेदवारांची निवड केली. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींचा टक्का देखील पुण्यात मोठा आहे. या पुणेकर महिलांना भाजपाचा निर्णय पसंत पडल्याचे सार्वत्रिक चित्र आहे. महिलांच्या सहभागामुळे महापालिकेचा कारभार निश्चितच सुधारणार असल्याची प्रतिक्रिया महिला व्यक्त करत आहेत.

### महिला मतदान वाढणार

**» राजकारण आणि प्रशासनात महिला अधिक संवेदनशीलतेने आणि पारदर्शकतेने काम करत असल्याचा सार्वत्रिक अनुभव आहे. सार्वजनिक जीवनातील महिलांच्या समावेशामुळे राजकारण अधिक सुसंस्कृत होण्यास मदत होते. या पार्श्वभूमीवर भाजपाने महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अत्यंत चांगला पायंडा पाडला आहे. सर्वाधिक महिला उमेदवार दिल्याने मतदानाला बाहेर पडणाऱ्या महिलांची संख्या वाढणार असून, सर्वाधिक महिला उत्साहाने भाजपाला मतदान करतील, असे राजकीय विश्लेषकांचे म्हणणे आहे.**

# शिवनेरी - नाणेघाट डिजीटल गाईड कार्यान्वित करा

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शिवजयंतीला उद्घघाटनाची 'सह्याद्री' ची मागणी!

**पुणे | प्रतिनिधी**

युनेस्कोच्या जागतिक वारसास्थळाचा मान मिळालेल्या शिवनेरी किल्ल्यासह सातवाहनकालिन नाणेघाटाच्या ऐतिहासिक माहितीचा खजिना डिजीटल स्वरूपात येत्या शिवजंयतीला (19 फेब्रुवारी 2026) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते उपलब्ध करून देण्याची मागणी सह्याद्री गिरिभ्रमण संस्थेने भारतीय पुरातत्व विभागाकडे केली आहे.

याबाबत संस्थेचे अध्यक्ष राहुल जोशी यांनी सांगितले की," किल्ले शिवनेरीला युनेस्कोचे मानांकन मिळाल्यानंतर शिवनेरी सह सातवाहनकालीन नाणेघाट आणि लेणीसमूहांना भेट देणाऱ्या पर्यटकांचा ओघ देशाच्या कानाकोपऱ्यासह परदेशातुन दिवसेंदिवस वाढत चालला आहे. शिवनेरी किल्ल्यावरील अंबरखाना इमारतीमधील वारसा संग्रहालय आणि माहिती केंद्रासाठी सह्याद्री गिरीभ्रमण संस्थेकडून पाठपुरावा सुरू आहे. अंबरखाना इमारतीच्या संवर्धनाचे काम देखील प्रगतीपथावर आहे. मात्र त्या अगोदर शिवनेरी पाहताना शिवभक्त पर्यटकांना हेडफोनमधून शिवनेरीची सविस्तर माहिती मिळावी, यासाठी भारती पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाने 'डिजिटल हेरिटेज ऑडिओ सेल्फ गायडेड'टूर योजनेचा शुभारंभ आणि युनेस्को शिवनेरी लोगोचे अनावरण येत्या शिवजयंतीला 19 फेब्रुवारी रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्याबाबतचे विनंती पत्र संस्थेच्या वतीने भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या मुंबई विभागाला दिले आहे.



### अपूरी चुकीची माहिती जायला नको

» वारसा स्थळांविषयी नागरिकांचे वाढत असलेले कुतूहल आणि गेल्या काही वर्षातील वारसा पर्यटनास मिळत असलेला प्रतिसाद लक्षात घेऊन पुरातत्त्व विभागाने हा नवीन उपक्रम सुरू केला आहे. आत्तापर्यंत पर्यटकांना माहितीदर्शक पुस्तिका घेऊन, इंटरनेटवरील माहिती वाचून अथवा एखाद्या गाइड बरोबर वारसास्थळांमध्ये फिरावे लागत होते. मात्र, वारसाप्रेमींकडून अनेकदा पर्यटकांना अपुरी माहिती सांगितली जाते किंवा चुकीचे संदर्भही ऐकायला मिळतात. याची दखल घेऊन भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या मुंबई शाखेने आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने वारसा पर्यटन अधिक माहितीपूर्ण करण्याच निर्णय घेतला आहे. याची सुरुवात लोहगडापासून झाली आहे.

### लोहगड ठरला पहिला किल्ला

» 'डिजिटल हेरिटेज ऑडिओ सेल्फ गायडेड' टूर योजनेत लोहगड हा राज्यातील पहिला किल्ला ठरला आहे. प्रवेशद्वारापासून सुरू होणाऱ्या या ऑनलाइन टूरबरोबर नकाशानुसार फिरताना पर्यटकांना प्रत्येक बुरुज, माची, तटबंदीवर घडलेल्या ऐतिहासिक घडामोडींची माहिती जाणून घेता येणार आहे. सध्या मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीन भाषांमध्ये हा ऑडिओ वॉक होणार आहे.

### अशी मिळणार माहिती

» ऐतिहासिक घडामोडी, भौगोलिक रचना, बांधकाम शैलीची वैशिष्ट्ये यांची सविस्तर माहिती इंग्रजी, हिंदी आणि मराठीमध्ये ध्वनिमुद्रित करण्यात आली आहे. याची माहिती शिवभक्तांना संबधित ठिकाणाच्या वास्तूमध्ये मिळणार आहे..

किल्ले शिवनेरीवर गेल्या दोन महिन्यांपासून शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सहलीच्या संख्येत लक्षणीय वाढ झालेली आहे. दर आठवड्याला जवळपास पाच हजाराहून अधिक विद्यार्थी किल्ले शिवनेरीला भेट देतात. या विद्यार्थ्यांना गडाचे ऐतिहासिक महत्व सांगणे आवश्यक आहे. त्यासाठी नक्कीच डिजिटल गाईड हा उपक्रम फायदेशीर ठरेल जेणेकरून विद्यार्थ्यांना किल्ले शिवनेरीचा इतिहास व छत्रपती शिवरायांच्या पराक्रमाची सखोल व बिनचूक माहिती मिळेल. ऐतिहासिक घडामोडी, भौगोलिक रचना, बांधकाम शैलीची वैशिष्ट्ये यांची सविस्तर माहिती इंग्रजी, हिंदी आणि मराठीमध्ये ध्वनिमुद्रित करण्यात आली आहे. याची माहिती शिवभक्तांना संबधित ठिकाणाच्या वास्तूमध्ये मिळणार आहे.

---

# जागा द्या, अन्यथा आंदोलन तीव्र करू! आदिवासी ठाकर समाजाचा एल्गार

## खेड पंचायत समितीसमोर धरणे आंदोलन; ठाकर समाजाच्या हक्कासाठी राजकीय पक्ष एकवटले, सात कुटुंबांच्या जागेचा तिढा लवकरच सुटणार?

**पुणे | प्रतिनिधी**

कडधे (ता. खेड) गावातील ठाकर समाजासाठी मंजूर घरकुलांना तात्काळ जागा उपलब्ध करून द्यावी. या प्रकरणात दिरंगाई करणाऱ्या संबंधितांवर त्वरित कारवाई करण्यात यावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा आरपीआय पुणे जिल्हा श्रमिक ब्रिगेडचे अध्यक्ष संतोषनाना डोळस यांनी दिला.कडधे गावातील ठाकर समाजाच्या घरकुल प्रश्नासंदर्भात विविध मागण्यांसाठी आम आदमी पार्टी, खेड तालुका यांच्या वतीने आज खेड पंचायत समितीसमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनाचे नेतृत्व आम आदमी पार्टीचे खेड तालुका अध्यक्ष स्वप्रील गायकवाड यांनी केले.



आंदोलनात बोलताना स्वप्रील गायकवाड म्हणाले, आदिवासी ठाकर समाजाला शासनाकडून जागा मंजूर असतानाही ग्रामपंचायतीकडून आडकाठी घालण्यात येत आहे. हा प्रश्न अत्यंत गंभीर असून कडधे गावासह कान्हेवाडी, मोहकल, कमान, कडूस, दोंदे आदी गावांमध्येही आदिवासी बांधवांवर अन्याय होत आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी.

आरपीआय पुणे जिल्हा श्रमिक ब्रिगेडचे अध्यक्ष संतोषनाना डोळस म्हणाले, ठाकर समाजातील कुटुंबांना शासनाने घरकुलांसाठी जागा मंजूर केली असतानाही ग्रामपंचायत व पंचायत समिती स्तरावर अडथळे निर्माण होत आहेत. संबंधित कुटुंबांना घरकुल बांधण्यासाठी तात्काळ जागेचा ताबा द्यावा. या प्रक्रियेत अडथळा आणणाऱ्यांवर कारवाई न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र केले जाईल. दरम्यान, गटविकास अधिकारी विशाल शिंदे यांनी आंदोलकांचे निवेदन स्वीकारले.

ते म्हणाले, कडधे गावातील ठाकर कुटुंबांबाबत घरकुल विषयावर आतापर्यंत चार बैठका घेण्यात आल्या आहेत. त्यांच्यासाठी जिल्हाधिकारी पुणे यांनी 40 गुंठे जागा मंजूर केली असून त्या ठिकाणी कॉलनी उभारण्यात आली आहे. आणखी 14 घरकुले मंजूर असून त्यापैकी 7 घरकुलांचे काम सुरू आहे. ठाकर समाजाची कोणतीही फसवणूक झाली नाही आणि होणारही नाही.

### आदिवासी ठाकर कुटुंबांच्या प्रमुख मागण्या

» मंजूर घरकुलांसाठी जागेचा त्वरित ताबा द्यावा, जागा देण्यास टाळाटाळ करणाऱ्या दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, वंचित आदिवासी कुटुंबांच्या घरनोंदी तात्काळ ग्रामपंचायत दप्तरी नोंदवाव्यात, या मागण्यांसाठी राजगुरूनगर येथे खेड पंचायत समितीसमोर आम आदमी पार्टीच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलनाला वंचित बहुजन आघाडी व रिपब्लिकन पार्टी (आठवले गट) यांचा पाठिंबा मिळाला.